**वेळ : २.३० तास** **गुण : ७५**

**सूचना : १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**
**२) अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.**
**३) प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात.**

प्र. १ अ) महाराष्ट्रात मराठी सत्तेचा राजकीय सत्ता म्हणून उदय कसा झाला याचा सविस्तरपणे आढावा घ्या. (१५)

**किंवा**

ब) शिवकालीन समाज, संस्कृती व वाङ्मयविश्व याविषयी सविस्तर विवेचन करा.

प्र. २ अ) संत रामदास यांच्या साहित्यातून समाजहिताची तळमळ कशी व्यक्त झाली आहे ते लिहा. (१५)

**किंवा**

ब) संत बहिणाबाईंच्या वाङ्मयीन कार्याचा परिचय करून द्या.

प्र. ३ अ) "संत तुकोबांच्या अस्तित्वभानात सामाजिकता समाविष्ट होती आणि ती जागरूक होती", या विधानाचा परामर्श तुकारामांच्या निवडक अभंगांच्या आधारे करा. (१५)

**किंवा**

ब) संत वेणाबाईंच्या निवडक अभंगांचे सविस्तरपणे विवेचन करा.

प्र. ४ टिपा लिहा. **(प्रत्येक गटातील १)** (१५)

अ) १. अफजलखानाचा पाडाव

**किंवा**

२. रयतेचे राज्य

ब) १. संत बहिणाबाई

**किंवा**

२. संत रामदासांची राजकीय प्रकरणे

क) १. संत वेणाबाई यांचे जीवन चरित्र

**किंवा**

२. संत तुकाराम यांच्या पुढील अभंगाचे विवेचन करा -

"विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद-भ्रम अमंगळ॥
आइका जी तुम्ही भक्त भागवत। कराल ते हित सत्य करा॥"

प्र. ५ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. **(प्रत्येक गटातील १)** (१५)

अ) १. शिवकालीन महसूल व्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

२. छत्रपती राजाराम व मराठ्यांचा स्वतंत्र संग्राम याविषयी माहिती द्या.

ब) १. मनाचे श्लोक

**किंवा**

२. शिवकालीन कालखंड

क) १. 'आनंदवनभुवन' याविषयी माहिती द्या

**किंवा**

२. संत बहिणाबाई यांच्या पुढील अभंगाचे विवेचन करा -

"आकाशीचा सूर्य जळात बिंबला। तरी काय बुडाला तयामाजी॥
तैसा या शरीरी अलिप्तची असे। इंद्रियसमरसो असोनिया॥"

************



XSAGARDADMINYB86D40XSAGARDADMINYB86D40